Review Of Research
ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# स्थानिक स्वराज्य संस्था - महाबळेश्वर नगरपरिषद

श्री.भोसले एस.एच.[१] , प्रा.डॉ.शिंदे एस.पी.[२]
[१] संशोधक विद्यार्थी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
[२]मार्गदर्शक- छ. शिवाजी कॉलेज, सातारा.

**सारांश :-**
महाबळेश्वर या थंडहवेच्या ठिकाणीस्थानिक लोकांच्या गरजा भागविण्यासाठी ब्रिटीशांनी नगरपालिकेची स्थापना केली.या नगरपालिकेमार्फतस्थानिक लोकांना रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, विश्रांती गृह, शिक्षण इ. आवश्यक गरजांची पूर्तता केली. सुरूवातीस येथील कारभार पाहण्यासाठी एक त्रीसदस्यीय समिती नेमण्यात आलीहोती.मेडीकल ऑफिसरहा तिचा अध्यक्ष होता.नगरपालिका कायद्याने महाबळेश्वर मध्ये शासननियुक्तसुप्रिटेडंट महाबळेश्वर हे पदसिध्द अध्यक्ष होते. नगरपालिकेसस्थानिक लोकांकडून निधी गोळा करण्याचा अधिकार मिळाल्यानंतरस्थानिक लोांकांच्या गरजांची पुर्तता करण्यात येऊ लागलीत्यामुळेतेथील लोकांना सर्व सोईयुक्त मुलभूत गरजांची पुर्तता होवू लागली.. स्थानिक स्वराज्य संस्था हीस्थानिक लोकांच्या विकासासाठी अत्यंत महत्वाची असल्याने लोकांच्या गरजांची पुर्तता होऊ लागली.नगर पालिकेच्या उत्पन्नात उत्तोरोत्तर वाढ होत गेल्यानेतेथील नागरी जीवनाचा विकास झाला त्यामुळे या नगर पालिकेस वनश्री व स्वच्छता विभागामार्फत बक्षीस मिळाले आहे.




**प्रस्तावणा :-**
भारतात प्राचिन कालखंडाप ाासूनस्थानिक लोकांचा विकास करण्यासाठीस्थानिक स्वराज्य संस्थांचे अस्तित्व दिसून येते.परंतुही संस्था जात व परंपरागत वारसा या संकुचित आधार स्तंभावर आधारलेलीहोती.लोकशाही समाजव्यवस्थेत स्थानिक पातळीवर कारभार चालविण्याची जबाबदारी ज्या संस्थावर सोपविलेली असते त्या संस्थांना स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणतात.स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय सर्वप्रथम युरोपिय देशात झाला.भारतात ही पध्दत ब्रिटिशांनी रुजविली.भारतातील अधुनिकस्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक लॉर्ड रिपन यास मानले जाते.१६८७ साली मद्रास शहरासाठी पहिलीस्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यात आली.
महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील एक थंड हवेचे व प्रेक्षणीयस्थळ म्हणून गेल्या दीड शतकाहून अधिक काळ प्रसिध्द आहे.शहरात नागरीसुखसोयी पुरविण्याचे काम करणायास्थानिक स्वराज्य संस्थांना नगरपालिका म्हणतात.महाबळेश्वरात स्थानिक लोकांच्या सुखसोयी पुरविण्याचे काम नगरपालिके मार्फत केले जाते.

**विषय मांडणी:-**
भारतात बिटीश अंमल सुरु झ ााल्यानंतरस्थानिक लोकांच्या गरजा भागविण्यासाठी नगरपालिका व लोकल बोर्ड यासारख्या संस्था स्थापन करण्यात आल्या.रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, विश्रांती गृहे, दवाखाने इ.गरजा भागविण्यासाठीस्थानिक साधानांव्दारे निधी गोळा करण्यात येवू लागला.डोंगरी भागात थंड हवेच्या ठिकाणी लोकसंख्येचे बंधन न घालता नगरपरिषद स्थापन करण्यात येतात त्यांना वेगळा दर्जा दिला जातो.सध्या महाराष्ट्रात चिखलदरा, खुलानाबाद, महाबळेश्वर, माथेरान, पाचगणी, पन्हाळा या सहा थंड हवेच्या ठिकाणी नगरपरिषद आहेत.[१] महाबळेश्वर येथे २९ मे १८६७ रोजी नगरपरिषद स्थापन करण्यात आली.[२] महाबळेश्वर हेसातारा जिल्हयातील प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण आहे येथिल स्थानिक लोकांच्या गरजा भागविण्यासाठी १८२७ ते १८६६ च्या दरम्यान त्रिसदस्थीय समिती कारभार पाहत असे या त्रिसदस्थीय समितीत स्थानिक वैद्यकिय अधिकारी, वन अधिकारी, सुपरीटेन्डन्टहेतीन प्रतिनिधीहोते. त्यांना स्टेशन फंड, स्थानिक निधी व देणग्या याव्दारे या स्थळांचा विकास करण्यासाठी करगोळा करण्याचा अधिकार दिला होता.[३] १८३० मध्ये शासन नियुक्त मेडिकल ऑफिसर डॉ.वॉकर हा समितीचा अध्यक्ष होता.[४] शहराजवळील खेडयातील

नागरिकांना व्यावसायासाठी या ठिकाणी वसाहत करण्यासाठी प्रवृत्त केले जावू लागले पाणी, झरे, तळी, यांचे शोध घेण्यात आले. जंगलातील पादरस्ते, घोडेरस्ते, यांची बांधणी होवू लागली.त्यामूळे वाई व आंबेनळी घाटातूनहळूहळू बैलगाडी, घोडागाडीच्या वाहतुकीस सुरुवात झाली.महाबळेश्वरात १९४१ साली ५०९०, १९५१ साली ४९७२, १९६१ साली६०२९, तर १९७१ साली७३१८ इतकी लोकसंख्या होती.[५]

१९०१ च्या नगरपालिका कायद्याने महाबळेश्वरमध्ये शासन नियुक्त अधिकारी कारभार पाहू लागला त्यास सुप्रीटेंडन्ट महाबळेश्वर म्हणत असत ते नगरपालिका समितीत पदसिध्द अध्यक्ष होते.[६] तेस्थानिक अधिकारीतसेच शहरातीलश्रीमंत नागरिकांच्या सहाय्याने काम पाहत असत.त्यावेळी नगरपालिकेच्या उत्पन्नाचे मार्ग अत्याल्प होतेत्यामुळेनगरपालिकेचा खर्च बहूतांशी शासकीयतीजोरीतुनच चालत असे.१९२९ पर्यंत ही नगरपालिका शासकीय नगरपालिकाहोती.नगरपालिकेचा कारभार सुप्रिटेंडन्टच्या नियंत्रणाखाली चालत असे.सुरुवातीस ब्रिटीश अधिकारीसुप्रिटेंडन्टहोते. नंतर वाईच्या प्रांत ऑफिसरची नियुक्त होवू लागली गावातील शिकलेल्या, सुधारक, समाजसेवी व्यक्तींची नगरसेवक म्हणूनसरकार नियुक्त करत असे.[७]

१९४८ च्या आसपास नगरपालिकेचे उत्पन्न दीड लाखाकडे गेले.या काळात रस्त्यावर विजेची सोय, खडीचे पक्के रस्ते व बाजारपेठेचा मुख्य डांबरी रस्ता अशा सुधारणा करण्यात आल्या.१९६२ मध्ये नगरपालिकेचे अध्यक्षपद लोकनियुक्तप्रतिनिधींकडे आले.त्यावेळी फक्ततीनच वॉर्ड होते.पहिल्या नगराध्यक्ष होण्याचा मान श्रीमती थ्रिटी इराणा यांना मिळाला त्या १९६९-७० पर्यंत नगराध्यक्ष होत्या.[८] नगरपालिकेच्या स्थापनेवेळी नगरपालिकेकडे कोणतेही वाहन नव्हते.गंगाजळी नव्हती. नगरसेवक बसने प्रवास करुन सचिवालयात जात नगरपालिकेने ट्रक खरेदी केल्यानंतरत्यातूनच मुंबईचा प्रवास होत असे.

लोकसंख्या वाढल्यानंतर सात वॉर्ड झाले. आज १७ वॉर्ड आहेत. तर नगरपालिकेकडे १ फायर फायटर, १ ॲम्बुलन्स, शववाहिनी, ३ पाणी पुरवठा टँकर, ४ कचऱ्याचे ट्रक, ३ कचऱ्याचे टेंम्पो, १ व्हॅक्यूम क्लिनर, नगराध्यांसाठी ॲम्बेसिटर इ. एकूण १५ वाहणे आहेत.[९] १९६५ च्या कलम ६२ अन्वये नगरपालिकेतस्थायी समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, सार्वजनिक स्वच्छता, वैद्यकीय उपचार, आरोग्य समिती, शिक्षण समिती, पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती, शहर नियोजन व विकास समिती, महिला व बालकल्याण समिती, परिवहन समिती इ. समिती मार्फत कारभार चालतो.

१९६७ साली नगरपालिकेने गिरीस्थान प्रशालेची स्थापना केली.त्यानंतर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना केली.[१०] महाबळेश्वरात जवळजवळ ४०% लोक मुस्लीमसमाजाचे आहेत त्यांच्या शिक्षणासाठी उर्दु शिक्षणासाठी शाळा नं.३ सुरु केली आहे.तसेच शाळा नं.४ अंजुमन खैरोल इस्लाम स्कूल या नावाने सुरु केले आहे.महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण असल्यामुळेतेथे विविध पॉईट आहेत सुरुवातीस पॉईटकडे जाण्यासाठी कच्चे रस्तेहोते नगरपालिकेच्या माध्यमातूनत्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे.[११]शहरातील लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून वेण्णा नदीचे पाणी अडवुन तळे बांधण्यात आले आहेतेथूनच सर्व शहराला पाणी पुरवठा केला जातो याशिवाय नगरपालिकेच्या माध्यमातून बाग, ग्रथालय, बोटक्लब, दवाखाना, इ. गोष्टींचा विकास केला आहे.उत्तरोत्तर नगरपालिकेच्या उात्पन्नात वाढ होत आहे. २००५-०६ या वर्षी नगरपालिकेचे सर्व करासहित मिळणारे उत्पन्न ९,३८,६८,२१२ इतकेहोते. [१२]

महाराष्ट्र शासनाने सामाजिक वनीकरण कार्यक्रमातंर्गत वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनासाठी जाहीर केलेल्या पंचायत समिती, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका या गटातील महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार २००४ मिळाला आहेतर संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान योजनेमध्ये सहभाग घेवून सातारा जिल्हयात पहिला क्रमांक, पुणे महसूल विभागात पहिला क्रमांक व महाराष्ट्र राज्यामध्ये तिसरा क्रमांक मिळवला आहे. [१३]

## समारोपः-

नागरीस्थानिक प्रशासनात नगरपालिकांना फार महत्व आहे या पालिकांमूळे लोकोच्या अनेकसमस्यांकडे लक्ष देवून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. नागरी लोकोना मुलभूत गरजा सर्व सोईनीयुक्त मिळतात. महाबळेश्वर नगरपालिकेचे सुरुवातीचे उत्पन्न हजारांमध्येहोते आज मितीसते कोटीच्या घरात गेल्याने मुलभूत गरजांची पूर्तता झाल्याने नागरी जीवनाचा विकास झाला आहेतर शिक्षण, आरोग्य, पर्यटनाच्या दृष्टीने महाबळेश्वर नगरपालिकेने सर्वच क्षेत्रात प्रगती घडवुनआणली आहे म्हणून वनश्री व स्वच्छता विभागात नगरपालिकेस बहुमान मिळाला आहे.

**संदर्भग्रथः -**


१) संपा. जाधव तुकाराम - महाराष्ट्र वार्षिकी - २०११ - युनिक ॲकॅडमी पुणे - पा. नं. ५७२

२) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा १९९९ पा. नं. ८४३

३) कित्ता

४) कित्ता

५) Town planning &Voluation Dept. (Maharashtra) Urban Researchcell Pune (Satara District Valume - III - १९८० )

६) www.mhmc.com

७) संपा. रेड्डीसुनिला – सहयाद्रीचे रानफुल प्रकाश ऑफसेट पुणे पा. नं. ३६

८) कित्ता

९) दीक्षित संजय लिपीक नगरपालिका दि. २०/०९/०२०१२

१०) नगरपालिका वार्षिक अहवाल- २००५-०६ पा.नं.५

११) नगरपालिका वार्षिक अहवाल- २००३-०४ पा.नं.७

१२) नगरपालिका वार्षिक अहवाल- २००५-०६ पा.नं.१

१३) नगरपालिका वार्षिक अहवाल- २००५-०६ पा.नं.३